# आचार संहिता

बँका आणि गृहवित्त कंपन्यांकडे एम्पॅनल झालेले सर्व मूल्यांकक सदर आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करतील :

- पुरेसे ज्ञान आणि प्रामाणिक खात्री असेल तेव्हाच मत व्यक्त करणे.
- शैक्षणिक पात्रता किंवा अनुभवाबद्दल चुकीची माहिती देणे टाळणे.
- व्यावसायिक कामादरम्यान प्राप्त झालेली सर्व माहिती गोपनीय ठेवणे.
- व्यवसाय करताना प्रामाणिकपणा आणि न्यायपूर्ण वर्तन या सूत्रांचे पालन करणे.
- एकाच ग्राहकाच्या अन्य मूल्यांककाच्या कामाचा आढावा घेणे टाळणे. बँक वा गृहवित्त संस्थेने तसे लेखी आदेश दिल्यास व सदर आढावा संबंधित मूल्यांककासमोर केला गेल्यास त्याचा अपवाद असेल.
- मालमत्तेबद्दलचे वस्तुनिष्ठ मत आणि मानके यांच्याशी प्रामाणिक राहून निष्पक्ष मूल्यांकन अहवाल सादर करणे व केवळ ग्राहकाचे हित सांभाळण्याचा प्रयत्न न करणे.
- हितसंबंध आणि कर्तव्य यांच्यामध्ये संघर्ष होण्याच्या प्रसंगांपासून दूर राहाणे.
- स्वतःची व्यावसायिक प्रतिष्ठा अथवा व्यवसायाचे नाव कमी होणार नाही अशा प्रकारे वर्तन करणे.
- सदर आचारसंहितेचे तिच्यात वेळोवेळी होणाऱ्या बदल वा सुधारणांसहित पालन करणे.